ग्रामपंचायतीची प्रभाग रचना - स्त्रियांचे
आरक्षण निश्चित करण्यासाठी कार्यपध्दती.

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ / ग्रापनि२०११/प्र.क्र.२/का. ८,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ३२
दिनांक- १३/०५/२०११

## आदेश

ज्याअर्थी; सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, अन्वये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १० (२) मधील खंड (ब),(क),(ड) मध्ये सुधारणा करण्यात आली असून स्त्रियांसाठी ग्रामपंचायतींच्या **एकूण जागांच्या १/२ (एक द्वितियांश) जागा** (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासप्रवर्गामधील स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागा धरुन) स्त्रियांसाठी राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी: स्त्रियांसाठी राखीव जागांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी कार्यपध्दती ठरवून देणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी; राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानातील अनुच्छेद २४३-के तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १०-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखीव असलेल्या जागांचे आरक्षण निश्चित करतांना पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबवावी :-

१. या प्रयोजनार्थ या आदेशानंतर होणारी सार्वत्रिक निवडणूक ही पहिली निवडणूक समजण्यात यावी.

२. नियम ४ च्या तरतुदीनुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीकरीता लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार जागा आरक्षित करण्यात येतील.

३. त्याचप्रमाणे नियम ४ अ नुसार नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरीता एकूण जागांच्या २७% जागा सोडत पध्दतीने आरक्षित करण्यात येतील.

४. स्त्रियांकरीता राखीव ठेवावयाच्या एक द्वितीयांश जागांचे आरक्षण करतांना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग या प्रत्येक वर्गवारीतील आरक्षित जागांच्या एक द्वितीयांश जागा त्या त्या वर्गवारीतील स्त्रियांकरीता आरक्षित करण्यात येतील. आणि एकूण जागांच्या एक द्वितीयांश जागा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग या प्रत्येक वर्गवारीतील आरक्षित जागांसहीत ) स्त्रियांकरीता आरक्षित करण्यात येतील. असे करताना प्रत्येक तीन जागांच्या प्रभागात **जास्तीत जास्त दोन जागा** आणि दोन जागांच्या प्रभागात **जास्तीत जास्त एक जागा** स्त्रियांकरीता ( सर्व वर्गवारीतील स्त्रियांसह ) राखीव राहील.

५. त्यानंतर अनुसूचित जातीच्या किंवा यथास्थिती अनुसूचित जमातीच्या राखीव जागांपैकी १/२ ( एक द्वितीयांश ) जागा अनुसूचित जातीच्या किंवा यथास्थिती अनुसूचित जमातीच्या स्त्रियांकरीता सोडत पध्दतीने नियम ४ ब च्या तरतुदीनुसार राखीव ठेवण्यात येतील.

६. नियम ४ (३) मधील तरतुदीनुसार अनुसूचित जाती किंवा यथास्थिती अनुसूचित जमातीकरीता राखून ठेवावयाच्या जागांची संख्या प्रभागांच्या संख्येपेक्षा जास्त असेल अशावेळी प्रत्येक प्रभागात एक जागा अशा अनुसूचित जाती किंवा यथास्थिती अनुसूचित जमातीकरीता नेमून देण्यात येईल आणि उर्वरित जागा नियम ४ (२) च्या परंतुकानुसार देण्यात येतील. अशी तरतुद असल्यामुळे अशा परिस्थितीत अनुसूचित जाती किंवा यथास्थिती अनुसूचित जमातीकरीता स्त्रियांच्या जागा आरक्षित करताना ज्या प्रभागात एकापेक्षा जास्त जागा त्या प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीसाठी) आरक्षित झाल्या असतील अशा प्रभागात प्रथम प्रत्येकी एक जागा त्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी आरक्षित ठेवण्यात यावी. आणि त्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी द्यावयाच्या उर्वरित जागा सोडत पध्दतीने नेमून देण्यात येतील. असे करताना अशी सोडत त्या प्रवर्गाकरीता राखीव जागांमधूनच काढण्यात येईल.

७. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरीता अशा प्रवर्गाकरीता राखीव जागांपैकी **एक द्वितीयांश** स्त्री राखीव जागांचे आरक्षण नियम ४ ब च्या तरतुदीनुसार अशा प्रवर्गाकरीता राखीव प्रभागांमधून सोडत पध्दतीने काढण्यात येईल. **मात्र तीन जागांच्या प्रभागात दोन पेक्षा जास्त जागा स्त्रियांकरीता आरक्षित राहणार नाहीत याकरीता** अशी सोडत काढतांना वरील अनुक्रमांक ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करताना एखाद्या प्रभागात दोन स्त्री राखीव जागांचे ( मग त्या अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या कोणत्याही प्रवर्गातील असल्या तरी ) आरक्षण झाले असल्यास तो प्रभाग नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्गाच्या स्त्री राखीव आरक्षणाकरीता सोडत काढतेवेळी वगळण्यात यावा.

८. एखाद्या ग्रामपंचायतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागास प्रवर्गाकरीता **एकच जागा** आरक्षित होत असेल तर ती जागा पहिल्या निवडणुकीपासून सुरु होणाऱ्या लागोपाठच्या **प्रत्येक दोन निवडणुकांमध्ये एकदा** स्त्रियांसाठी चिठ्ठ्या काढून नेमून देण्यात येईल.

९. स्त्रियांकरीता राखीव असलेल्या एकूण जागांपैकी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग या वर्गवारीच्या स्त्रियांकरीतांच्या राखीव जागा वजा केल्यानंतर शिल्लक रहाणाऱ्या जागा सर्वसाधारण स्त्रियांकरीता राखीव राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

( प्राजक्ता भोसले )
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति - जिल्हाधिकारी, सर्व

C:\Documents and Settings\Administrator\Desktop\५०% reservation WF.doc

| लोकसंख्या | सदस्य संख्या | प्रभाग संख्या | प्रभाग निहाय सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १५०० किंवा १५०० पेक्षा कमी | ७ | ३ | ३,२,२ |
| १५०१ - ३००० | ९ | ३ | ३,३,३ |
| ३००१-४५०० | ११ | ४ | ३,३,३,२ |
| ४५०१-६००० | १३ | ५ | ३,३,३,२,२ |
| ६००१-७५०० | १५ | ५ | ३,३,३,३,३ |
| ७५०१ आणि अधिक | १७ | ६ | ३,३,३,३,३,२ |

| सदस्य संख्या | प्रभाग संख्या | प्रभानिहास सदस्य संख्या | मुंबई ग्रामपंचायत (गावाचे प्रभागात . . .) नियम १९६६, नियम ३(५)च्या परंतुकानुसार पुढील निवडणूकीत प्रभाग निहाय कमाल जागा चक्रानुक्रमे देणे . | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ३ | ३,२,२ | २,३,२ | २,२,३ | | | |
| ९ | ३ | ३,३,३ | ३,३,३ | ३,३,३ | | | |
| ११ | ४ | ३,३,३,२ | २,३,३,३ | ३,२,३,३ | ३,३,२,३ | | |
| १३ | ५ | ३,३,३,२,२ | २,३,३,३,२ | २,२,३,३,३ | ३,२,२,३,३ | ३,३,२,२,३ | |
| १५ | ५ | ३,३,३,३,३ | ३,३,३,३,३ | ३,३,३,३,३ | ३,३,३,३,३ | ३,३,३,३,३ | |
| १७ | ६ | ३,३,३,३,३,२ | २,३,३,३,३,३ | ३,२,३,३,३,३ | ३,३,२,३,३,३ | ३,३,३,२,३,३ | ३,३,३,३,२,३ |

| ग्रामपंचायतीतील एकूण सदस्य संख्या | नागरिकांचा मागास प्रवर्ग करिता राखिव जागा (एकूण सदस्य संख्येच्या २७%) |
|---|---|
| ७ | (१.८९) → २ |
| ९ | (२.४३) → २ |
| ११ | (२.९७) → ३ |
| १३ | (३.५१) → ४ |
| १५ | (४.०५) → ४ |
| १७ | (४.५९) → ५ |

| ग्रामपंचायतीतील एकूण सदस्य संख्या | ग्रामपंचायतीतील सदस्य संख्येच्या एकूण महिला राखीव जागा (१/२) |
|---|---|
| ७ | (३.५) → ४ |
| ९ | (४.५) → ५ |
| ११ | (५.५) → ६ |
| १३ | (६.५) → ७ |
| १५ | (७.५) → ८ |
| १७ | (८.५) → ९ |

| ग्रामपंचायतीतील एकूण अनुसुचित जाती /जमाती करिता आरक्षित जागा | ग्रामपंचायतीतील एकूण अनुसुचित जाती / जमाती करिता आरक्षित जागापैकी महिला राखीव जागा |
|---|---|
| १ | लागोपाठच्या प्रत्येक दोन निवडणूका मध्ये एकदा |
| २ | १ |
| ३ | (१.५) → २ |
| ४ | २ |
| ५ | (२.५) → ३ |
| ६ | ३ |
| ७ | (३.५) → ४ |
| ८ | ४ |
| ९ | (४.५) → ५ |
| १० | ५ |
| ११ | (५.५) → ६ |
| १२ | ६ |
| १३ | (६.५) → ७ |
| १४ | ७ |
| १५ | (७.५) → ८ |
| १६ | ८ |
| १७ | (८.५) → ९ |

| ग्रामपंचायतीतील एकूण सदस्य संख्या | ग्रामपंचायतीतील एकूण ना.मा.प्र. सदस्य संख्या | ग्रामपंचायतीतील एकूण ना.मा.प्र. सदस्य संख्येपैकी महिला राखीव जागा |
|---|---|---|
| | | १ |
| ७ | २ | १ |
| ९ | २ | (१.५) → २ |
| ११ | ३ | २ |
| १३ | ४ | २ |
| १५ | ४ | (२.५) → ३ |
| १७ | ५ | |